पुढारी



शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थिनी सुबिया मुल्लाणी हिला स्मृतिचिन्ह व मदतनिधी प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# डिफ ऑलिम्पिकपटू सुबिया मुल्लाणीने विद्यापीठातर्फे ५० हजारांचा मदतनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची जलतरणपटू सुबिया मुल्लाणी हिने ब्राझील येथे झालेल्या डिफ ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. ही बाब विद्यापीठ परिवारासाठी अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. शुक्रवारी मुल्लाणी हिच्यासह कोटा येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त करून तामिळनाडूतील राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला फुटबॉल संघातील क्रीडापटूंचा सत्कार करण्यात आला. सुबियाला ५० हजार रुपयांचा मदतनिधी प्रदान करून विद्यापीठामार्फत तिचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, प्रशिक्षक प्रकाश कावले, विशेष प्रशिक्षक मृणाल खोत, व्यवस्थापक नीळकंठ कांबळे उपस्थित होते.

18 JUN 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अस्वस्थपर्व' आंतरराष्ट्रीय संबंधांवरचा संदर्भ ग्रंथ

## परिचर्चेतील सूर ; श्रीराम पवार लिखित 'अस्वस्थपर्व' पुस्तकावर मंथन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक-संचालक, राजकीय विश्लेषक श्रीराम पवार लिखित 'अस्वस्थपर्व' पुस्तक आंतरराष्ट्रीय राजकारण आणि एकूणच आंतरराष्ट्रीय संबंधांवरचा संदर्भ ग्रंथ आहे. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर सर्वांसाठीच तो येत्या काळात मार्गदर्शक ठरेल. कारण प्रत्येक आंतरराष्ट्रीय घटना, घडामोडींचा सामान्य माणसाच्या जगण्यावरही परिणाम होत असतो, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात झालेल्या परिचर्चा कार्यक्रमातून उमटला. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे झालेल्या या कार्यक्रमातून या पुस्तकावर सर्वांगीण मंथन झाले. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. रोहन चौधरी यांनी पुस्तकाविषयीची विस्तृत मांडणी केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या वतीने 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार लिखित 'अस्वस्थपर्व' पुस्तकावर शुक्रवारी परिचर्चा झाली. त्याचे उद्‍घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शेजारी 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव, प्रा. डॉ. रोहन चौधरी, डॉ. अशोक चौसाळकर, श्रीराम पवार, डॉ. प्रकाश पवार,
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा )

डॉ. पवार म्हणाले, "वर्चस्ववादातून सुरू असलेले लष्करी सामर्थ्य, अर्थकारण, विज्ञान-तंत्रज्ञान आणि एकूणच देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय राजकारण असे चार कंगोरे पुस्तकातून प्रकर्षाने मांडले आहेत. राजकारणावर अर्थकारणाचा प्रभाव आहे. लोकशाहीच्या मूल्यांचा ऱ्हास होतो आणि बहुसंख्याकवादातून विषमता वाढीस लागत असून, हे चित्र बदलण्यासाठी आपण स्वतः काय करू शकतो, असा प्रश्न विचारणारी स्पष्ट भूमिका त्यातून घेतलेली दिसते."

डॉ. चौधरी म्हणाले, "अस्वस्थपणाचा गर्व असणाऱ्यांसाठी 'अस्वस्थपर्व'' हे पुस्तक एक चपराक आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांवर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक मिळत नसल्याच्या परिस्थितीत या पुस्तकामुळे हा विषय सामान्यांपर्यंत पोचला आहे. प्रत्येक घटना-घडामोडींवर पुस्तकातून अगदी सूक्ष्म पातळीवरची अभ्यासपूर्ण मांडणी झाली असून, येत्या काळात अधिकाधिक सामान्य लोकांपर्यंत हा विषय पोचण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत."

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "श्री. पवार यांच्या पुस्तकातील प्रत्येक प्रकरण 'पीएच.डी'च्या शोधप्रबंधाचा विषय आहे. पुस्तकातील प्रत्येक प्रकरणावर राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र विभागात गटचर्चा व्हायला हवी."

ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, "शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्याशाखेतून पत्रकारितेची पदवी घेतलेल्या श्रीराम पवार यांची आज आंतरराष्ट्रीय राजकारणाचा तटस्थपणे; पण ठाम भूमिका घेऊन लिहिणारे राजकीय विश्लेषक अशी देशभरात ओळख आहे, ही गोष्ट नक्कीच अभिमानास्पद आहे. त्यांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण आणि सहज व सोप्या भाषेतील संवादाच्या शैलीमुळे सामान्य माणसालाही ते सहज समजते. विशेष म्हणजे प्रत्येक लेखातून ते सर्वांनाच अंतर्मुख व्हायला भाग पाडतात."

संपादक-संचालक श्रीराम पवार म्हणाले, "गेल्या काही वर्षांतील एकूणच जागतिक घडामोडींचा वेध घेतल्यास जगाच्या इतिहासाला वेगळे वळण मिळाले आहे. लोकशाहीवादी राष्ट्रे आणि एकाधिकारशाहीला प्रोत्साहन देणारी राष्ट्रे अशी सरळ-सरळ दोन भागांत जगाची विभागणी झाली. त्यातून निर्माण झालेल्या वर्चस्ववादातून अनेक प्रकारचे ताण निर्माण होत आहेत आणि त्याचा जगभरातील सामान्य माणसाच्या जगण्यावरही परिणाम होतो. या साऱ्यांचा वेध पुस्तकातून घेतला गेला आहे."

'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, "आंतरराष्ट्रीय घडामोडींवर भाष्य करण्यासारखा क्लिष्ट विषय 'अस्वस्थपर्व' पुस्तकातून अत्यंत सोप्या पद्धतीने मांडला गेला आहे. मराठी भाषेतून हा वेध घेताना श्रीराम पवार यांची आता राष्ट्रीय पातळीवरील राजकीय विश्लेषक म्हणून ओळख निर्माण झाली. जगात कुठेही एखादी घटना घडली तर त्याचा सामान्य माणसावरही परिणाम होतो, याची जाणीव या पुस्तकामुळे आता प्रत्येकाला झाली आहे."

दरम्यान, राज्यशास्त्र अधिविभागाचे डॉ. सुखदेव उंदरे व नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यशवंतराव चव्हाण रुरल डेव्हलपमेंट स्कूलचे डॉ. नितीन माळी यांनी आभार मानले.

### आंतरराष्ट्रीय राजकारणावर लवकरच विद्यापीठात अभ्यासक्रम

आंतरराष्ट्रीय राजकारण आणि एकूणच संबंधांकडे अजूनही गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यामुळे याबाबतचा अभ्यासक्रमही कुठे नाही. मात्र, येत्या काळात त्याची आवश्यकता असल्याची मते या कार्यक्रमात व्यक्त झाली. त्याचा परामर्श घेत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठात असा अभ्यासक्रम लवकरात लवकर सुरू करावा. त्याशिवाय, या विषयात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही प्रोत्साहनपर योजना राबविता येतील का, याचाही विचार करावा, अशा सूचना राज्यशास्त्र विभागाला दिल्या. त्यासाठी सर्वतोपरी सहकार्याची ग्वाहीही त्यांनी या वेळी दिली.

पुण्यनगरी

# विद्यार्थ्यांचे यश कौतुकास्पद : कुलगुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात अभ्यास करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले यश कौतुकास्पद आहे. त्यांनी यापुढील काळातही उत्तुंग यश मिळवावे, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. एमपीएससी परीक्षेत विद्यापीठाच्या यूजीसी पुरस्कृत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील चार विद्यार्थ्यांनी यश मिळवले. त्यांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. यावेळी अक्षय भागम (कोदे, ता. शाहूवाडी) याची महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेमध्ये सहायक अभियंता या वर्ग-१ या पदावर, रविकुमार पाटील (मुदाळ) यांची पीएसआयपदी आणि शिरीष शहापुरे (हासूर, ता. शिरोळ) व पूजा अवघडे (कोल्हापूर) या दोघांची नायब तहसीलदारपदी निवड झाली. या विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

18 JUN 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभा निवडणुकीचे पडघम

## पदवीधर नोंदणी ३० जूनपर्यंत; विकास आघाडी, विकास मंचाकडून नोंदणीस प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**



### अशी असेल अधिसभा (आकडे प्रतिनिधींचे)

महाविद्यालयीन शिक्षक १०, नोंदणीकृत पदवीधर १०, प्राचार्य १०, संस्थाचालक ६, शिक्षकेतर कर्मचारी १, विद्यापीठ अधिविभाग, प्रशासन कर्मचारी १, विद्यापीठ प्राध्यापक ३, राज्यपाल नियुक्त प्रतिनिधी १०, विधान परिषद २, विधानसभा १, स्थानिक स्वराज्य संस्था १.

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. विद्यापीठाने जाहिरात प्रसिद्ध करून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पदवीधर नोंदणी करण्याची सूचना केली आहे. ३० जूनपर्यंत पदवीधर नोंदणी करण्याची अंतिम मुदत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची मुदत ३१ ऑगस्टला संपणार आहे. तत्पूर्वी नवीन अधिसभा सदस्य येण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यापीठाचे पदवीधर मतदानाद्वारे प्रतिनिधी निवडतात. त्यासाठी ३० जून अखेर कोल्हापूर, सांगली सातारा येथील पदवीधरांची नोंदणी करावी लागणार आहे. जे पदवीधक नोंदणीकृत आहेत त्यांना पदवीधर मतदार म्हणून नोंदणी करावी लागणार आहे. नव्याने नोंदणी करणाऱ्या पदवीधरांना दोन्ही नोंदणी एकाच वेळी करावी लागेल. यासाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागेल. याबाबतची सर्व माहिती संकेतस्थळार उपलब्ध आहे.

### कार्यकर्ते सक्रिय

शिवाजी विद्यापीठातील विकास आघाडी आणि विद्यापीठ विकास मंच या दोन्ही गटांनी पदवीधर नोंदणीस प्रारंभ केला आहे. समविचारी संघटना, विद्यार्थी संघटना आणि राजकीय पक्ष यांच्या माध्यमातून पदवीधर नोंदणी करण्यास प्रारंभ केला आहे.